# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (स्थापना विभाग)

जाहिरात क्र. 569/ज.स./2018 दि. 03/ 02/2018

## जाहीरात

## भरती प्रक्रियेबाबत उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना

नागपूर शहर महानगरपालिका, नागपूर यांचे अग्निशमन विभागाच्या आस्थापनेवरील खाली नमूद केलेल्या संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी प्रस्तुत जाहीरातीत नमूद केल्याप्रमाणे पदाची शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पूर्तता करणा–या पात्र उमेदवारांकडून www.nmcnagpur.gov.in व https:// maharecruitment.mahaoline.in या संकेत स्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

ऑनलाईन अर्ज भरण्यासंबंधी वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| 1 | ऑनलाईन पध्दती अर्ज सुरू होण्याचा दिनांक | 05/02/2018 |
| 2 | ऑनलाईन पध्दतीने अर्ज अंतीम दिनांक | 20/02/2018 |
| 3 | संगणकीय चलनाद्वारे बँक आफ महाराष्ट्र यांच्या शाखेमध्ये फि स्विकृतीचा कालावधी | 21/02/2018 |

**भरावयाच्या रिक्त पदांचा तपशील**

| अ. क्र | पदाचे नांव | वेतनश्रेणी ग्रेड पे | प्रवर्ग | एकुण पद संख्या | समांतर आरक्षण | | | | | | | समांतर आरक्षण व्यतिरीक्त (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | महिला 30% | अपंग 3% | माजी सैनिक 15% | खेळाडू 5% | भुकंप ग्रस्त 2% | प्रकल्प ग्रस्त 5% | अंशकालीक बरोजगार 10% | |
| 1 | अग्निशमन केंद्र अधिकारी | 9300–34800 ग्रेड पे 4400 | अजा | 01 | – | – | – | – | – | – | – | 01 |
| | | | अज | 01 | – | – | – | – | – | – | – | 01 |
| | | | मुक्त | 03 | 01 | – | – | – | – | – | – | 02 |
| | | | **एकुण** | **05** | **01** | **–** | **–** | **–** | **–** | **–** | **–** | **04** |
| 2 | चालक यंत्र चालक | 5200–20200 ग्रेड पे 2400 | अजा | 08 | 02 | – | 01 | – | – | – | 01 | 04 |
| | | | अज | 03 | 01 | – | – | – | – | – | – | 02 |
| | | | विजा(अ) | 02 | 01 | – | – | – | – | – | – | 01 |
| | | | भज(क) | 03 | 01 | – | – | – | – | – | – | 02 |
| | | | भज(ड) | 01 | – | – | – | – | – | – | – | 01 |
| | | | विमाप्र | 01 | – | – | – | – | – | – | – | 01 |
| | | | इमाव | 12 | 04 | 0 | 02 | 01 | 0 | 01 | 01 | 03 |
| | | | मुक्त | 27 | 08 | 01 | 04 | 01 | 01 | 01 | 03 | 08 |
| | | | **एकुण** | **57** | **17** | **01** | **07** | **02** | **01** | **02** | **05** | **22** |
| 3 | फिटर कम ड्रायव्हर | 5200–20200 ग्रेड पे 2400 | विजा(अ) | 01 | – | – | – | – | – | – | – | 01 |
| | | | इमाव | 01 | – | – | – | – | – | – | – | 01 |
| | | | मुक्त | 02 | 01 | – | – | – | – | – | – | 01 |
| | | | **एकुण** | **04** | **01** | **–** | **–** | **–** | **–** | **–** | **–** | **03** |
| 4 | इलेक्ट्रीशियन | 5200–20200 ग्रेड पे 2400 | मुक्त | 01 | | – | – | – | – | – | – | 01 |
| | | | एकुण | **01** | | | | | | | | **01** |

- **नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती :-**

| अ.क्र. | पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| 1 | अग्शिनमन केंद्र अधिकारी | **अ) सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार शैक्षणिक पात्रता :-**<br>1. कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.<br>2. राष्ट्रीय अगिनशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचा स्टेशन ऑफीसर ॲन्ड इन्स्ट्रक्टर पाठयक्रम (अग्निशमन अभियांत्रीकी पदविका) उत्तीर्ण असावा. किंवा महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी महाराष्ट्र शासन यांचा 1 वर्ष कालावधीचा उपस्थानिक अधिकारी व अग्निप्रतिबंधक अधिकारी हा पाठयक्रम पूर्ण केलेला असावा किंवा दि इन्स्टीटयुट फायर इंजिनिअर्स (यु.के.) किवा (इंडिया) या संस्थेकडून ग्रेड –आय पदवी प्राप्त केलेली असावी.<br>3. मराठीचे ज्ञान असणे आवश्यक (लिहीणे, वाचणे व बोलणे)<br>4. एमएससीआयटी परिक्षा उत्तीर्ण असावा.<br>**ब) किमान शारिरीक पात्रता :-**<br>1. उंची 165 से.मी. (महिला उमेदवारासाठी उंची 162 से.मी.)<br>2. छाती – साधारण 81 से.मी. फुगवुन 5 से.मी. जास्त. (महिला उमेदवारासाठी लागु नाही. )<br>3. वजन 50 कि.ग्रॅ.<br>4. दृष्टी – चांगली.<br>**क) अनुभव** :- 'अ+' वर्ग महानगरपालिकेतील सहा. अग्निशमन केंद्र अधिकारी, या पदावर किमान 3 वर्ष सेवा पूर्ण केलेली असावी. किंवा 'अ' वर्ग महानगरपालिका/विशेष नियोजन प्राधीकरण/शासकीय /निमशासकीय अग्निशमन सेवेमध्ये सहा. अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान 4 वर्ष सेवा पूर्ण केलेली असावी.<br>किंवा 'ब' व 'क' वर्ग महानगरपालिकामध्ये अग्निशमन सेवेमध्ये अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान 3 वर्ष सेवा पूर्ण केलेली असावी.<br>किंवा 'ड' वर्ग महानगरपालिकेमध्ये अग्निशमन केंद्र अधिकारी या पदावर किंवा समकक्ष पदावर किमान 4 वर्ष सेवा पूर्ण केलेली असावी.<br>**ड) वयोमर्यादा** :- सरळसेवेच्या उमेदवाराचे वय 40 वर्षापेक्षा जास्त नसावे. शासकीय /निमशासकीय अग्निशमन सेवेमधील कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी वयाची अट लागु राहणार नाही. |
| 2 | चालक यंत्र चालक | **अ) सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार शैक्षणिक पात्रता :-**<br>1. माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>2. जड वाहन चालक म्हणून 3 वर्ष काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक.<br>3. वैध जड वाहन चालविण्याचा परवाना.<br>4. मराठीचे ज्ञान असणे आवश्यक (लिहीणे, वाचणे व बोलणे)<br>5. राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासन मुंबई यांचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण केलेला असल्यास प्राधान्य.<br>**ब) किमान शारिरीक पात्रता :-**<br>1. उंची 165 से.मी. (महिला उमेदवारासाठी उंची 162 से.मी.)<br>2. छाती – साधारण 81 से.मी. फुगवुन 5 से.मी. जास्त. (महिला उमेदवारासाठी लागु नाही. )<br>3. वजन 50 कि.ग्रॅ.<br>4. दृष्टी – चांगली.<br>**क) पाठयक्रम :-**<br>उमेदवारांची नियुक्ती झाल्यानंतर त्यांना राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा पाठयक्रम पुर्ण केला नसेल तर त्या सदर प्रशिक्षण केंद्राचा 3 महिने कालावधीचा प्राथमिक अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम पुर्ण करणे, आवश्यक राहील.<br>**ड) वयोमर्यादा** :- उमेदवाराचे वय 30 वर्षापेक्षा जास्त नसावे. |

| | | |
|---|---|---|
| 3 | फिटर कम ड्रायव्हर | **अ) सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार शैक्षणिक पात्रता :—**<br>1. माध्यमिक शालांत परिक्षा उत्त्तीर्ण असणे आवश्यक.<br>2. आय टी. आय मधील मोटर मेकॅनिकल / डिझेल मेकॅनिक/समकक्ष कोर्स उत्त्तीर्ण असावा.<br>3. जड वाहन चालविण्याचा कमीत कमी 3 वर्षाचा अनुभव असावा.<br>4. वैध जड वाहन चालविण्याचा परवाना.<br>5. मराठीचे ज्ञान असणे आवश्यक (लिहीणे, वाचणे व बोलणे)<br>6. एमएससीआयटी परिक्षा उत्त्तीर्ण असावा.<br>7. वयोमर्यादा किमान 18 वर्ष कमाल 33 वर्ष. आरक्षीत प्रवर्गासाठी किमान 18 व कमाल 38 वर्ष. |
| 4 | इलेक्ट्रीशियन | **अ) सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार शैक्षणिक पात्रता :—**<br>1. माध्यमिक शालांत परिक्षा उत्त्तीर्ण असणे आवश्यक.<br>2. आय टी. आय मधील इलेक्ट्रीशियन/समकक्ष कोर्स उत्त्तीर्ण असावा.<br>3. वैध जड वाहन चालविण्याचा परवाना.<br>4. एमएससीआयटी परिक्षा उत्त्तीर्ण असावा.<br>5. मराठीचे ज्ञान असणे आवश्यक (लिहीणे, वाचणे व बोलणे)<br>**ब) वयोमर्यादा** :— उमेदवाराचे वय किमान 18 वर्ष कमाल 33 वर्ष. आरक्षीत प्रवर्गासाठी किमान 18 व कमाल 38 वर्ष. |

2. सेवायोजन कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जिल्हा सैनिक मंडळाकडील सदर उमेदवारांनी तसेच प्रकल्पग्रस्त अंशकालीन अशा उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत वेबसाईटवर वरील मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे आवश्यक आहे. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारले जाणार नाही. अथवा उमेदवारांना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

**वयोमर्यादा :—**

3.1. उपरोक्त पदासाठी सर्व प्रवर्गातील उमेदवारांचे वय अर्ज स्विकृतीच्या अंतीम दिनांकास किमान 18 वर्षे पूर्ण असणे आवश्यक राहील. खुल्या व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवाराकरीता कमाल वयोमर्यादा पदनिहाय रकान्यात नमूद प्रमाणे राहील. (वर्यामर्यादा दि. 20/02/2018 रोजीची गणली जाईल)

3.2. शासन निर्णय क्र. प्रकल्प—1016/मु.स.396/प्र.क्र.56/06/16—अ दि. 03/02/2007 नुसार प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त यांना कमाल वयोमर्यादा 45 वर्ष इतकी राहील.

3.3. स्वातंत्र सैनिकांसाठी विहीत वयोमर्यादेची सवलत सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमाक : मासैक—1010/प्र.क्र. 279/1016—अ दि. 20/08/2010 प्रमाणे वयाची कमाल मर्यादा 45 वर्षे पर्यंत राहील.

3.4. शासन निर्णय क्र. प्र.अक—1009/प्र.क्र. 200/2001/16—अ दि. 27/10/2009 नुसार पदवीधर /पदविकाधारक अंशकालीन उमेदवार असल्यास वयाची कमाल मर्यादा 46 वर्ष राहील.

3.5. शासन निर्णय क्र. राक्रीधु—2002/प्र.क्र. 68/क्रियुसे—2 दि. 01/07/2016 नुसार खेळाडू उमेदवारांना वयोमर्यादा 43 वर्षे इतकी राहील.

3.6. उन्नत व प्रगत गटामध्ये मोडणा—या विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांना वयोमर्यादेची सवलती, शुल्कामधील सवलती शिवाय कोणत्याही सवलतीस पात्र समजल्या जाणार नाही.

3.7. नागपूर शहर महानगरपालिका, नागपूर स्थायी कर्मचा—यांना म.न.पा. नागपूर अग्निशमन विभागातील सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार वयाची अट लागु राहील.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याबाबतच्या व इतर सर्वसाधारण सूचना महापालिकेच्या http://maharecruitment.mahaonline.gov.in/www.nmcnagpur.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्यांचे उमेदवारांनी काळजीपूर्वक अवलोकन करून अर्ज करावे.

**4. अर्ज, अर्हता, परिक्षा शुल्क इत्यादी :—**

**4.1.** ऑनलाईन पध्दती शिवाय अन्य कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारले जाणार नाही. अर्ज स्विकारण्यांसाठी विहीत केलेला दिनांक व वेळेनंतर अर्ज स्विकारले जाणार नाही. .

4.2. महाराष्ट्र शासन, केंद्र शासन, स्थानिक स्वराज्य संस्थ आणि इतर सेवेत असलेल्या उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करावा. त्याचवेळी त्यांनी ज्या पदासाठी अर्ज केला असेल, त्या पदाचे नांव, जाहीरातीचा संदर्भ व अर्ज स्विकारण्यासाठी विहीत केलेला अंतीम दिनांक इत्यादी तपशील आपल्या विभाग/कार्यालय प्रमुखांना कळवावा आणि आपला अर्ज विचारात घेतला जाण्यास कोणताही आक्षेप असल्यास अर्ज स्विकारण्याच्या अखेरच्या दिनांकापासुन 15 दिवसाचे आंत तसेच आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांना परस्पर कळविणेची

विनंती आपल्या विभाग /कार्यालय प्रमुखांनी करावी. अर्ज विचारात घेणे हरकत नसल्यास, आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांना तसे कळविण्याचा आवश्यकता नाही हे ही त्यांना कळवावे.

4.3. अर्ज करण्या–या उमेदवारांनी जाहीरातीचे दिनांकास ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाच्या आवश्यकतेप्रमाणे शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर सर्व अर्हता सादर करणे/अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

1. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.आरजीडी–1511/प्र.क्र. 89/2011/13 दि. 23/08/2011 मधील आदेशानुसार विद्यापिठ अनुदान आयोग मान्यता प्राप्त विद्यापिठ, अभिमत विद्यापिठे, स्वायत्त संस्था इत्यादीच्या विविध पदविका, पदवी व पदव्युत्तर पदव्यांना केंद्र शासनाच्या मानव संसाधन विभाग (शिक्षण विभाग), मंत्रालयाकडून केंद्र शासनाच्या सेवेतील नियुक्तीसाठी वेळावेळी प्रदान केलेली व भविष्यात प्रदान केली जाणारी समकक्षता राज्य शासनाच्या सेवेतील नियुक्तीसाठी ग्राहय धरण्यात येईल.
2. विद्यापिठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेल्या विद्यापिठ/अभिमत विद्यापिठ (Deemed University) अथवा विद्यापिठ अनुदान आयोग, अथवा AICTE ने मान्यता दिलेल्या स्वायत्त संस्थामधील शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक आहे.
3. स्वायत्त संस्थांचे कोर्स हे भारतातील विद्यापिठ संघाने मान्यता दिलेल्या कोर्सशी समकक्ष असणे आवश्यक आहे.
4. सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांना संबंधीत केंद्रीय मान्यता मंडळाची (AICTE, MCI,PCI,BCI,NCPE etc) त्या– त्या संस्थेत /महाविद्यालयात, विद्यापिठात अभ्यासक्रम चालविण्याची मान्यता असणे आवश्यक आहे.
5. संशोधनाच्या पदव्यांना त्या–त्या विद्यापिठात/अभिमत विद्यापिठात/स्वायस्त संस्थेत असे संशोधन अभ्यासक्रम चालविण्यांची विद्यापिठ अनुदान आयोगाची मान्यता असणे आवश्यक आहे.
6. संबंधीत पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये तरतुद असल्यासच महाराष्ट्र शासनाने समतुल्य शैक्षणिक अर्हता म्हणून मान्य केलेल्या अर्हता स्वीकारार्ह असतील.
7. मान्यताप्राप्त विद्यापिठाबाबत उमेदवाराने धारण केलेली शैक्षणिक पात्रता ती केंद्रशासन व राज्य शासन यांचेकडील तद्नुषंगीक आदेश, निर्णय प्रमाणे असणे आवश्यक आहे.
8. वरील प्रवर्गनिहाय पदसंख्या व आरक्षण यामध्ये काही कारणाने बदल झाल्यास या बाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना राहतील.
9. समांतर आरक्षणाबाबत सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्रमांक एस.आर.व्ही.–1012/ प्र.क्र.16/12/16–अ दि. 13/08/2014 अन्वये आणि तद्नंतर शासनाने त्या संदर्भात वेळावेळी निर्गमीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.
10. कोणत्याही उमेदवाराने एकाच पदासाठी एकापेक्षा जास्त वेळेस अर्जाची नोंदणी केली असल्यास त्यामधील अर्जाची फी भरण्याची विवरणे समान असल्यास फक्त शेवटची नोंदणी ग्राहय धरण्यात येईल व इतर नोंदी झालेल्या अर्जाची फी जप्त करण्यात येईल. तसेच ऑनलाईन परिक्षेस एका पेक्षा जास्त वेळा उपस्थित राहील्यास उमेदवारी तात्काळ रद्द करण्यात येईल.
11. ऑनलाईन अर्ज व या संकेत स्थळाद्वारे दि. 05/02/2018 ते 20/02/2018 या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

4.4. परिक्षा शुल्क :–

1. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी रक्कम रू. 800/–
2. मागास/इतर प्रवर्गातील उमेदवारांसाठी रक्कम रू. 400/–

4.5. परिक्षा शुल्क भरल्या बाबतची बॅंक चलनाची प्रत कागदपत्रे तपासणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

**5. अर्ज भरणे व सादर करणेबाबत आवश्यक सूचना :–**

5.1. उमेदवाराने अर्ज भरण्यापूर्वी http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर जावून जाहीरात सविस्तर अभ्यासावी. भरावयाची सर्व माहिती आपल्याकडे उपलब्ध आहे, याची खात्री करावी व नंतरच आपला अर्ज भरावा. अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्विकारले जातील.

5.2 पात्र उमेदवाराला वेब बेस (web based) ऑनलाईन अर्ज दि. 05/02/2018 ते 20/02/2018. कालावधीतच http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर सादर करणे आवश्यक राहील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

5.3. अर्जात हेतुपुरस्पर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्याच्या प्रतितील नोंदीत अनाधिकृतपणे खोडाखोड करणे किंवा खोडाखोड केलेले वा बनावट दाखल सादर करणे, परिक्षा कक्षातील गैरवर्तन, परिक्षेच्या वेळी नक्कल करणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणे, यासारखे अथवा परिक्षा कक्षाचे बाहेर अथवा परिक्षे नंतरही गैरप्रकार करणा–या उमेदवारांना गुण कमी करणे, विशिष्ट किंवा सर्व परिक्षांना वा निवडींना अनर्ह ठरविणे. यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करणेचा तसेच प्रचलीत कायदा व नियमाचे अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांना राहतील. तसेच

विहीत केलेल्या अर्जतेच्या अटी पूर्ण न करणा–या अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल.

5.4. वय, शैक्षणिक अर्हता, मागासप्रवर्ग /नॉन'क्रिमीलीयर प्रमाणपत्र, अपंग, महिला , माजी सैनिक, खेळाडू, अनुभव, पात्रता, इत्यादी संदर्भात न चुकता अर्जामध्ये स्पष्टपणे/निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधीत रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास संबंधीत दाव्यांचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

5.5. वयाच्या पूराव्यासाठी सक्षम प्राधीका–याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, एस.एस.सी. परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधीका–याने दिलेले प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल.

5.6. एस.एस.सी/मॅट्रीक्युलेशन अथवा शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला, या प्रमाणपत्रावरील जन्म दिनांकानुसार अर्जामध्ये जन्म दिनांक निवडावा. स्त्री/पुरूष संदर्भात संबंधीत पर्याय निवडावा, तसेच अमागास,मागास, नॉन क्रिमीलेयर, अपंग, माजी सैनिक, खेळाडू, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, अंशकालीन इत्यादी संदर्भात लागु असलेली माहिती निवडावी.

5.7. शैक्षणिक अर्हतेसंदर्भात आवश्यक माहिती दिलेल्या प्रमाणे नमूद करावी. संबंधीत परिक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याच्या दिनांक समजण्यात येईल. व त्या आधारे उमेदवारांची पात्रता ठरविण्यात येईल.

5.8. गुणाऐवजी श्रेणी पध्दत असल्यास गुणपत्रकासोबत श्रेणीची यादी सादर करावी.

5.9. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे. सर्वसाधारण प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे

1. प्रोफाईल निर्मिती /प्रोफाईल अद्यावत करणे.
2. अर्ज सादरीकरण
3. शुल्क भरणा.

**5.10. प्रोफाईल निर्मिती /प्रोफाईल अद्यावत करणे.**

1. http://maharecruitment.mahaonlice.gov.in या संकेतस्थळावर वापर कर्त्याने प्रोफाईल निर्मिती करण्याकरीता नवीन वापर कर्त्याची नोंदणीवर क्लिक केल्यानंतर यंत्रणा लॉग–इन पृष्ठ प्रदर्शित करेल. नवीन खाते (वापरकर्त्याचे नांव Login व Password ) निर्माण करण्यासाठी लॉग–इन पृष्ठाद्वारे विचारलेली सर्व माहिती भरून नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी.

2. प्रोफाईलद्वारे माहिती भरतांना उमेदवाराने स्वतःचाच ई–मेल आय.डी, मोबाईल क्रमांक व जन्म दिनांक नोंदविणे आवश्यक आहे.

3. उमेदवाराकडे नित्य वापरात असे असा ई–मेल आय.डी. व भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच भरती प्रक्रिये दरम्यान पत्र व्यवहार, प्रवेशपत्र आणि इतर माहिती ऑनलाईन देण्यात येणार असल्याकारणामुळे भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये नोंदणीकृत सदर ई–मेल आय.डी. व भ्रमणध्वनी क्रमांक वैध/कार्यरत राहणे आवश्यक आहे.

4. वरीलप्रमाणे प्रोफाईलची निर्मिती झाल्यानंतर वापर कर्त्याने स्वतःच्या Login व Password द्वारे प्रवेश करून प्रोफाईलमध्ये विचारलेली वैयक्तीक माहिती संपर्क तपशील, इतर माहिती शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी संदर्भातील तपशीलाची अचुक नोंद करावी.

5. फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे :–

नोंदणीची प्रक्रिया व प्रोफाईलद्वारे विचारलेली माहिती भरून झाल्यानंतर उमेदवाराने स्वतःचे छायाचित्र/फोटो (रूंदी 3.5 से.मी. x उंची 4.5 से.मी.) व स्वतःचीच स्वाक्षरी स्कॅन करून **खालीलप्रमाणे अपलोड करावी.**

1. एका पांढ–या स्वच्छ कागदावर विहीत आकाराचा फोटो चिकटवावा. फोटोवर स्वाक्षरी करू नये अथवा फोटो साक्षांकित करू नये. वरील सूचनानुसार फोटो कागदावर व्यवस्थित चिटकवावा. स्टॅपल अथवा पिनींग करून नये. फक्त स्कॅनरवर ठेवून थेट स्कॅन करता येईल.

2. फोटोचा आकार खालीलप्रमाणे असणे गरजेचे आहे.

(रूंदी 3.5 से.मी. x उंची 4.5 से.मी.)

3. छायाचित्र अर्जाचा दिनांकाचा 6 महिन्याहून आधी काढलेले नसावे. आणि ते ऑनलाईन परिक्षेच्या वेळी उमेदवाराच्या रूपाशी जुळणारे असावे.

4. विहीत आकार/क्षमतेप्रमाणे काळया शाईचे पेनने स्वच्छ कागदावर स्वाक्षरी करावी.

5. उमेदवाराने स्वतः स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. अन्य कोणत्याही व्यक्तीने स्वाक्षरी केल्यास ती ग्राहय धरण्यात येणार नाही.

6. वरीलप्रमाणे विहीत आकारातील फक्त फोटो व स्वाक्षरी वेगवेगळी स्कॅन करावी, संपूर्ण पृष्ठ अथवा फोटो व स्वाक्षरी एकत्रीत स्कॅन करू नये.

7. फोटो व स्वाक्षरीची प्रत्येकीची संपूर्ण ई–मेल स्कॅन करून JPG फॉर्मेटमध्ये संगणकावर वेगवेगळया फाईल्समध्ये स्वतंत्रपणे जतन (save) करावी. फोटो, तसेच स्वाक्षरी इमेज प्रत्येकी 50 केबी पेक्षा जास्त असता कामा नये. यापेक्षा जास्त क्षमतेची इमेज प्रणालीवर स्वीकारली जात नाही. इमेजची साईजपेक्षा जास्त असल्यास 50 केबी स्कॅनरचे dpriresolution.no.of.colours etc. द्वारे स्कॅनिंगच्या वेळी Setting Adjust करावे.

8. स्कॅन करून अपलोड केलेली स्वाक्षरी प्रवेशपत्र/हजेरीपट व तत्सम कारणासाठी वापरण्यात येईल. परिक्षेच्या वेळी प्रत्यक्ष कागदपत्रे तपासणीच्या वेळी व अन्य कोणत्याही वेळी अर्ज भरतांना केलेली स्वाक्षरी व फोटो न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. अथवा अन्य कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

**5.11. अर्ज सादरीकरण :–**

1. http://maharecruitment.mahaonlice.gov.in या संकेतस्थळावर वापर कर्त्याने स्वतःच्या युजर आयडी पासवर्डद्वारे प्रवेश यशस्वीरित्या (login) केल्यानंतर ''ऑनलाईन अर्ज'' येथे क्लिक करावे.'' जाहीरातीद्वारे प्रसिध्द केलील्या पदाबाबतची यादी या ठिकाणी उपलब्ध होईल.

2. ज्या पदासाठी अर्ज करावयाच्या असेल त्या जाहिरातीच्या उजवीकडे असलेल्या ''अर्ज करण्यासाठी'' येथे क्लिक करा'' या ठिकाणी क्लिक करावे.

3. उमेदवाराच्या प्रोफाईलच्या आधारे यंत्रण वैधता तपासले. वापरकर्ता जाहिरातीतील निकष पूर्ण करीत असल्यास वापर कर्त्याला अर्ज सादर करता येईल.

4. जाहिरातीमध्ये नमूद केलेले निकष वापरकर्ता पूर्ण करीत नसल्यास माहिती संग्रहीत होवू शकत नाही. असा संदेश यंत्रणा प्रदर्शित करेल. अर्ज यशस्वीरित्या सादर झाल्यानंतरच तुमचा अर्ज यशस्वीरित्या जतन झाला असा संदेश यंत्रणा प्रदर्शित करेल.

5. रक्कम भरा या पर्यायावर क्लिक करून अर्जदाराला क्रेडीट कार्ड/डेबीट कार्ड/नेट बॅंकींग द्वारे भरणा करता येईल. अथवा अर्जदार ऑनलाईन अर्ज सादर करून भारतीय स्टेट बॅंकमध्ये चलनाद्वारे शुल्काचा भरणा करण्याचा पर्याय स्विकारू शकेल.

**5.12. शुल्क भरणा :–**

यशस्वीरित्या अर्ज सादर केल्यानंतर परिक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता खालील नमूद केलेल्या पध्दतीचा अवलंब करावा.

1. शुल्क भरण्याकरीता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील ''माझे खाते'' या लिंकवर क्लिक करावे''

2. ''माझे खाते'' या लिंकवर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या कार्यालयाचे नांव निवडल्यानतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदाची यादी शुल्क भरल्याचा/न भरल्याचा नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर ''Unpaid'' असे लिहलेले असेल त्या ठिकाणी ''pay now''अशी लिंक उपलब्ध असेल.

3. ''pay now'' या लिंकवर क्लिक केल्यावर 2 पर्याय उपलब्ध होतील. अ) ऑनलाईन पेमेंट ब) चलनाद्वारे

4. क्रेडीट कार्ड/डेबीट कार्ड अथवा नेट बॅंकींगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करता येईल.

5. चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास उपलब्ध होणा–या चलनाची प्रत घेवून भारतीय स्टेट बॅंक च्या कोणत्याही शाखेत, बॅंकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जावू शकतो.

6. भारतीय स्टेट बॅंकमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याचा 2 तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापूढील कामकाजाच्या दिवशी बॅंकेच्या कार्यालयीन वेळेत परिक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील.

7. चलनाद्वारे शुल्क स्विकारण्याकरीता भारतीय स्टेट बॅंक उमेदवाराकडून परिक्षा शुल्क व्यतिरीक्त नियमानुसार सेवाशुल्क आकारेल, अशाप्रकारे उमेदवारास चलनाद्वारे शुल्क भरतांना +बॅंकेच्या सेवाशुल्क भरावे लागतील.

**5.13. सर्वसाधारण सूचना :–**

1. नोंदणी व अर्ज भरण्याची प्रक्रिया उमेदवाराने स्वतःच करणे आवश्यक आहे.

2. अर्ज मराठी व इंग्रजीमध्ये उपलब्ध करून देण्यात आला असला तरी संगणक प्रक्रियेकरीता अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. अर्जातील संपूर्ण माहिती CAPPITAL LETTERS मध्ये भरावी. संक्षिप्तपणे (Abberivations) वा आद्याक्षरे (INISIALS) न देता संपूर्ण नाव व संपूर्ण पत्ता नमूद करावा. नावाच्या /पत्त्याच्या दोन भागामध्ये एका स्पेसने जागा सोडावी.

3. महिला उमेदवारांनी पूर्वाश्रमीच्या नावाने (By Birth) अर्ज करणे आवश्यक आहे.

4. एस.एस.सी अथवा तत्सम प्रमाणपत्रावरील नावाप्रमाणे अर्ज भरावेत. त्यानंतर नाव बदलले असल्यास अथवा प्रमाणपत्रातील नावात कोणत्याही प्रकारचा बदल झाला असल्यास त्या संबंधीचा बदला संदर्भातील राजपत्राची प्रत कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करावी.

5. पत्रव्यवहाराच्या स्वतःचा पत्ता इंग्रजीमध्ये लिहावा. व्यवसायिक मार्गदर्शन केंद्र, स्वयं अध्ययन मार्गदर्शन केंद्र /वर्ग अथवा तत्सम स्वरूपाचा कोणत्याही मार्गदर्शन केंद्राचा/ संस्थेचा पत्ता पत्रव्यवहारासाठी देवू नये.

6. अर्जामध्ये केलेला दावा व कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर केलेल्या सारांशपत्राची अथवा सादर केलेल्या कागदपत्रातील दावा यामध्ये फरक आढळुन आल्यास अर्जामधील माहिती अधिकृत समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पूरावे सादर करू न शकल्याने /मिळाल्याने उमेदवारी रद्द होवू शकते.

7. संबंधीत पदाच्या /परिक्षेच्या जाहीराती/अधिसूचनेमध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करूनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता आजमावली जाईल. व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया पूर्ण होईल.

8. एकाहून अधिक सेवेच्या/पदाच्या अथवा इतर परिक्षा अथवा मुलाखती एकाच दिवशी असल्यास याबाबत विचारपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे. परिक्षेचा दिनांक, वेळ, केंद्र यामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य करण्यात येणार नाही. तसेच भरलेल्या शुल्काचा परतावा देखील करता येणार नाही.

5.14 वरील कार्यपध्दती ही अर्ज करण्याची योग्य पध्दत आहे. याशिवाय दूस—या पध्दतीने केलेले अर्ज हे अवैध ठरविण्यात येईल.

5.15. उमेदवाराने अर्जात स्वतःचे नाव, सामाजिक प्रवर्ग कोणत्या प्रवर्गातुन अर्ज करू इच्छिते आहे तो प्रवर्ग, जन्म दिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई—मेल आय.टी इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी. सदरची माहिती चुकल्यास त्यास नागपूर महानगरपालिका, जबाबदार राहणार नाही.

,5.16 उमेदवाराने अर्जावर केलेली स्वाक्षरी, ही त्यांच्या प्रवेशपत्रावर /उपस्थिती पत्रावर एकाच प्रकारची असेल याची दक्षता घ्यावी. तसेच उमेदवाराने ऑनलाईन अपलोड केलेले छायाचित्र वरीलप्रमाणे सर्व ठिकाणी एकच असेल याची दक्षता घ्यावी.

5.17 पूर्णतः माहिती भरलेल्या अर्जाची प्रिंट आऊट काढुन घ्यावी. प्रिंट काढलेल्या अर्जाची प्रत जपून ठेवावी. अर्जाची प्रिंट परिक्षेच्या वेळी तसेच कागदपत्रे तपासणीचे वेळी सोबत आणणे आवश्यक आहे.

5.18 अर्ज सादर केलेल्या उमेदवारास कागदपत्रांच्या छानणीशिवाय ऑनलाईन परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येत आहे. त्यामुळे उमेदवार ऑनलाईन परिक्षा उत्तीर्ण झाला तरी आवश्यक ती शैक्षणिक व इतर अर्हता असल्याशिवाय व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही. केवळ ऑनलाईन परिक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे उमेदवारास निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी संबंधीचा पदांचा पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज करावा.

5.19 भरती प्रक्रियेच्या संदर्भातील माहिती व त्यानुषंगाने होणा—या बदलाबाबतची सर्ब माहिती केवळ nmcnagpur.govt.in व http://maharecruitment.mahaonlice.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. या व्यतिरीक्त कोणत्याही माध्यमाद्वारे भरती प्रक्रियेची माहिती उपलब्ध होणार नाही. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

5.20 विहीत दिनांकानंतर व विहीत वेळेनंतर आलेला कोणताही अर्ज संगणकीय प्रणालीमध्ये स्विकृत केला जाणार नाही.

5.21 ऑनलाईन प्रक्रियेबाबत कोणतीही तक्रार असल्यास महाऑनलाईच्या वेबसाईवर दिलेल्या दूरध्वनीक्रमांकावर सोमवार ते शनिवार कार्यालयीन वेळेत सकाळी 10.00 ते सायंकाळी 06.00 या वेळेत संपर्क साधावा. किंवा अर्ज भरण्यासंबंधी प्रवेश पत्र उपलब्ध होण्यासाठी उमेदवारांनी व mr.support@mahaonline.gov.in यावर ई—मेल पाठविल्यानंतर उमदेवारांना त्यांच्या अडवणीचे निराकरण करून उमेदवारांच्या भ्रमणध्वनीवर संदेश किंवा ई—मेल आयडी वर पाठविण्यात येईल. उमेदवाराने अर्जामध्ये त्यांच्या भ्रमणध्वनी क्रमांक व ई—मेल इत्यादी अचुकपणे भरणे अनिवार्य आहे.

5.22 उमेदवाराने आपले वैध ई—मेल आय.डी. व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक आहे. तसेच सदर ई—मेल आय.डी. व भ्रमणध्वनी क्रमांक ऑनलाईन परिक्षेचा अंतीम निकाल लागेपर्यंत वैध असणे आवश्यक आहे. उमेदवाराने ऑनलाईन परिक्षेचा नोंदविलेला ई—मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक चुकीचा /अपूर्ण असल्यास तसेच भ्रमणध्वनी क्रमांक एनसीपीआर रजिस्ट्र्ड (डीएनडी) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणा—या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्यांची संपूर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवारांची राहील. तसेच ई—मेल आयडी व भ्रमणध्वनी संदेश वहनात येणा—या तांत्रीक अडचणींना नागपूर महानगरपालिका, जबाबदार राहणार नाही. प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याबाबतचा संदेश ई—मेल /एस.एम.एसद्वारे कळविण्यात येईल. उमेदवाराने आपल्या ई—मेल आय.डी.ची कोणत्याही

परिस्थितीत इतर व्यक्तीसोबत देवाण–घेवाण करून नये. एखादया उमेदवाराचा वैध ई–मेल आय.डी. नसल्यास त्याने अर्ज करण्यापूर्वी स्वतःचा ई–मेल आय.डी. तयार करणे आवश्यक आहे.

**6. ऑनलाईन परिक्षा :–**

6.1. 1. जाहीरातीत नमूद करण्यात आलेल्या प्रत्येक पदासाठी ऑनलाईन परिक्षा वेगवेगळी घेण्यात येईल.

2. परिक्षेसाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, अंक गणीत/बुध्दीमत्ता चाचणी व विषय ज्ञान या विषयावर वस्तुनिष्ठ बहूपर्यायी प्रश्न असतील. सदर परिक्षेचा दर्जा हा संबंधीत पदाकरीता विहीत करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेनुसार तसेच संबंधीत पदासाठी आवश्यक असलेल्या कौशल्य तपासणीस पूरक राहील.

3. प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहूपर्यायी स्वरूपाच्या असतील. प्रश्न पत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास 1 गुण असतील.

1. जाहीरातीत नमूद पदांकरीता अर्ज केलेल्या ऑनलाईन परिक्षेरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांचे ऑनलाईन परिक्षेचे प्रवेश पत्र www.nmcnagpur.gov.in व http://maharecruitment.mahaonlice.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन परिक्षेच्या किमान 8 (आठ) दिवस अगोदर टाकण्यात येतील. (अपलोड करण्यात येतील) उमेदवारानी संकेतस्थळावरून ऑनलाईन परिक्षा प्रवेश पत्र स्वतः काढुन घ्यावे. प्रवेशपत्राद्वारे उमेदवारांना ऑनलाईन परिक्षेचा दिनांक, वेळ, व परिक्षा केंद्र याबाबतची माहिती प्राप्त होईल.

2. परिक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेश पत्र आणणे बंधनकारक आहे. त्याशिवाय कोणत्याही उमेदवारास परिक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही. परिक्षेनंतर प्रवेश पत्र स्वतःजवळ जपुन ठेवावे.

3. काही अपरिहार्य कारणास्तव ऑनलाईन परिक्षेच्या तारखांना / परिक्षेच्या ठिकाणामध्ये बदल करावा लागल्यास त्याबाबतची माहिती www.nmcnagpur.gov.in व http://maharecruitment.mahaonlice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत लेखी स्वरूपात कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार केला जाणार नाही. परिक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशपत्र आणणे बंधनकारक आहे. त्याशिवाय उमेदवारास परिक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही. परिक्षेनंतर प्रस्तुत प्रवेश स्वतःजवळ जपुन ठेवावे.

4. उमेदवाराने लेखी परिक्षेच्या ठिकाणामध्ये बदल करण्यासंबंधी केलेल्या विनंतीचा विचार करण्यात येणार नाही.

6.2 शारिरीक पात्रतेची किमान अर्हता व शारिरीक क्षमता चाचणी

अ) शारिरीक पात्रतेची किमान अर्हता

1) उंची 165 से.मी

2) वजन 50 कि.ग्रॅ.

3) छाती 81 से.मी. न फुगविता, 86 से.मी. फुगवुन (Minimum Exapaasion 5 cms)

4) दृष्टी चांगली

ब) शारिरीक क्षमता चाचणी

| | | |
|---|---|---|
| 1) 15 फुट दोर चढणे | :– | 15 गुण |
| 2) 100 मीटर्स अंतर 50 किलोग्रॅम मानवी प्रतिकृती खांद्यावर घेवून धावणे | :– | 15 गुण |
| 3) शिडी चढणे / उतरणे | :– | 15 गुण |
| 4) उंची – (अधिक असल्यास) | :– | 05 गुण |
| 5) पोहणे | :– | 20 गुण |

I

महत्वाची सूचना :– उपरोक्त नमूद केलेल्या शारिरीक मोजमाप व मैदानी चाचण्यापैकी कोणत्याही एका मोजमापामध्ये /चाचणीमध्ये उमेदवार अपात्र ठरल्यास पूढील उर्वरीत चाचण्या घेण्यात येणार नाहीत व त्याला निवड प्रक्रियेतुन बाद ठरविण्यात येईल. सदर कामी संबंधीत चाचण्या घेण्यासाठी नेमणूक करण्यात आलेल्या नियंत्रण अधिकारी यांचा निर्णय अंतीम राहील.

**6.3 ओळख पटविणे :–**

1. परिक्षा केंद्रावर प्रवेश पत्रासह उमेदवाराचे ओळख पटविणारे, मुळ कागदपत्रासह व उमेदवारच या अलीकडील फोटो चिकटवलेले वैध फोटो, ओळखपत्र जसे, पॅनकार्ड (Pan Card)/पारपत्र (Pass port)/मतदान ओळखपत्र (Voter I.D.) /आधारकार्ड/ फोटोसहीतचे पासबुक /कर्मचारी ओळखपत्र फोटोसहीत असणारे बार कॉन्सीलचे ओळखपत्र समवेक्षक/पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराची ओळख उमेदवाराचे प्रवेशपत्र, हजेरीपत्रक/उपस्थिती पत्रक आणि त्यांना सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे वटविली जाईल. जर उमेदवारांची ओळख पटविण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परिक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही.

टिप :– उमेदवाराने परिक्षेला उपस्थित राहतांना स्वतःचे ओळख पटविण्यासाठीची आवश्यक ती मुळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती परिक्षेच्या प्रवेश पत्रासह सादर करणे आवश्यक आहे. परिक्षेच्या प्रवेश पत्रावरील (परिक्षेसाठी नोंदणी केल्यानुसार) सोबत सादर करण्यात येणा–या ओळखपत्राशी ततोंतंत जुळणे आवश्यक आहे. ज्या

महिला उमेदवाराच्या पहिल्या /मधल्या/शेवटच्या नावात विवाहनंतर बदल घडला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. सदर महिला उमेदवारांनी नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र/विवाह नोंदणी प्रमाणपत्र यापैकी एक पूरावा सादर करणे आवश्यक आहे. परिक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र या मधील नावात कोणतीही तफावर आढळल्यास उमेदवारास परिक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

2. **परिक्षेला उशिरा येण्याबाबत. :—** परिक्षेच्या प्रवेशपत्रात परिक्षेला हजर राहण्यासाठी दिलेल्या वेळेनंतर येणा—या उमेदवारांना परिक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही. प्रवेशपत्रावरील परिक्षेसाठी उपस्थित राहण्याची वेळ ही प्रत्यक्ष परिक्षा सुरू होण्याआधीची असणार आहे. उमेदवारास ओळख पटविणे, आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, परिक्षेसाठी लॉग इन करणे, सूचना देणे, या सर्व बाबी पूर्ण करण्यासाठी साधारण 1 तास आधी परिक्षा स्थळावर उपस्थित रहावे लागेल.

6.4. परीक्षेच्या वेळेत किंवा एकूण निवड प्रक्रिये दरम्यान जर उमेदवार

1. अनुचीत प्रकार करणे किंवा

2. तोतयेगिरी करणे किंवा तोतयांच्या सेवा वापरणे किंवा

3. परिक्षेच्या ठिकाणी गैरवर्तणुक करणे किंवा परिक्षेच्या पेपर मधील माहिती किंवा तत्संबंधी काही माहिती कोणत्याही कारणांसाठी पुर्ण किंवा त्याचा काही भाग तोंडी किंवा लेखी किंवा इलेक्ट्रॉनिकली किंवा मेकॅनिकली उघड करणे, प्रकाशित करणे, पाठवणे, साठवणे किंवा

1. स्वतःच्या उमेदवारीबद्दल अनियमित किंवा अयोग्य पध्दतीचा अवलंब करणे किंवा

2. स्वतःच्या उमेदवारीबद्दल गैरमार्गाने पाठींबा मिळविणे किंवा

3. भ्रमणध्वनी किंवा तत्सम दळणवळणाची इलेक्ट्रॉनिक साधने यांचा वापर परिक्षेच्या ठिकाणी करणे अशा कृत्यांमध्ये दोषी आढळल्यास अशा उमेदवारांस गुन्हेगारी कारवाईस सामोरे जावे लागेल तसेच सदर उमेदवारांस

1. तो ज्या परिक्षेला बसणार आहे त्या परिक्षेसाठी त्या उमेवारांला अपात्र ठरविले जाईल.

2. नागपूर शहर महानगरपालिकेतर्फे घेण्यांत येणाऱ्या वेगवेगळयापरिक्षेसाठी बसण्यापासून काही ठराविक कालावधीसाठी किंवा कायमचे प्रतिरोधित (Debarred) केले जाईल, जर उमेदवार नागपूर शहर महानपालिकेच्या सेवेत आधीच रूजू झाला असेल तर त्याची सेवा समाप्त केली जाईल.

**7. निवड पध्दत :—**

7.1 जाहिरातीमध्ये नमुद पदांकरिता उमेदवारांची निवड ऑनलाईन परिक्षेमध्ये मिळणाऱ्या एकूण गुणांच्या आधारे गुणानुक्रमे तयार केलेल्या यादीनुसार करण्यांत येईल. ज्यापदांकरिता व्यवसायीक चाचणी, शारिरिक क्षमतेची चाचणी विहित केलेली आहे अशा पदांकरिता उमेदवारांची निवड ऑनलाईन परिक्षा, व्यावसायीक चाचणी व शारीरिक क्षमतेची चाचणी यामध्ये मिळणाऱ्या एकुण गुणांच्या आधारे गुणानुक्रमे तयार केलेल्या यादीनुसार करण्यांत येईल.

7.2 ऑनलाईन परिक्षा झाल्यानंतर त्या दिवशी उत्तरतालाका (www.nmcnagpur.gov.in) महापालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल. त्याबाबत उमेदवाराची हरकत असल्यास त्यांनी 3 दिवसांत या mr.support@gmail.mahaonline.gov.in .ई—मेलवर पाठवाव्यात. उमेदवारांकडून समक्ष हरकती स्विकारल्या जाणार नाही. तसेच ई—मेल व्यतिरीक्त अन्य कोणत्याही मार्गाने प्राप्त झालेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. त्या अनुषंगाने घेण्यांत येणारे निर्णय अंतीम राहतील.

7.4 ऑनलाईन परिक्षे नंतर पात्र उमेदवारांना मिळालेल्या गुणांची यांदी संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल.

7.5 शासन निर्णय क्र. प्रनिमं/1214/प्र.क्र.43/14/13—अ, दिनांक 5/6/2014 नुसार गट क, गट ब मधील कोणत्याही पदासाठी मुलाखत घेण्यांत येणार नसल्याने भरती प्रक्रियेत पात्र झालेल्या उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधतील मुळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे तपासणी करिता पडताळणी समितीकडे उपलब्ध करून द्यावी लागतील. अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

7.6 समान गुण असणाऱ्या उमेदवारांचा गुणवत्त क्रम, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रनिमं/1215/(प्र.क्र.55/15)/13—अ, दिनांक 5/10/2015 मधील नमूद केलेल्या निकषावर लावला जाईल.

7.7 ऑनलाईन परिक्षेच्या निकालानंतर संभाव्य निवड क्षेत्रामध्ये येणाऱ्या उमेदवारांना कागदपत्रे तपासणी करिता पाचारण करण्यांत येईल. त्याबाबतची यादी व वेळापत्रक नागपूर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल. तसेच ई—मेलवर अथवा मोबाईलवर मॅसेजव्दारे कळविण्यांत येईल.

7.8 कागपदपत्रे पडताळणीसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव, जाती प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, वयाबाबतचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र, समांतर आरक्षणा बाबतचा दावा, बँक चलन इत्यादी बाबतची सर्व मूळ कागदपत्रे व त्याची प्रत्येकी एक साक्षांकीत प्रतीसह उमेदवाराने उपस्थित राहणे आवश्यक आहे. कागदपत्रे तपासणीचे वेळी उमेदवार शैक्षणिक व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा तपासणीकरिता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास त्यास निवडीसाठी अपात्र करणेत येईल व त्याबाबत उमेदवारांची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

7.9 कागदपत्रे तपासणी करिता निवड यादी नागपूर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल.

7.10 प्रमाणपत्र तपासणी करिता येते वेळी स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतःचे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड, किंवा ड्रायव्हींग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड) प्रकारचे यापैकी किमान कोणतेही एक ओळखपत्र व त्यांची सस्वाक्षांकीत (Self Attested) छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

**8. सामाजीक व समांतर आरक्षण बाबत :–**

8.1 जातीच्या दाव्याच्या पुष्टयर्थ महाराष्ट्र अनु. जाती, अनु. जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्यांचे व त्यांच्या पडताळणीचे विनिमय) अधिनियम 2000 मधील तरतुदी नुसार सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रदान करण्यांत आलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

8.2 उमेदवारांने अर्जामध्ये जात प्रवर्गाचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

8.3 विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागासवर्ग इतर मागासवर्गाचा दावा करणा–या (या प्रवर्गातील महिला खेळाडू माजी सैनिक, अंपग अंशकालीन कर्मचारी स्वातंत्र सैनिकाचे पाल्य, प्रकल्प ग्रस्त, भुकंपग्रस्त या समांतर आरक्षणाचा दावा करणा–या) उमेदवाराने उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत आहे किंवा नाही याबाबत अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.

8.4 उमदेवार महाराष्ट्र राज्याचा रहवासी असावा. उमेदवाराने कागदपत्रे पडातळणीचे वेळी अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

8.5 फक्त कायम स्वरूपाचे अपंगत्व असलेल्या उमेदवारांना व अपंग व्यक्तीसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचे व वयोमर्यादेतील सवलतीचे फायदे देय असतील. तात्पुरत्या स्वरूपातील अपंगत्वाचे प्रमाणपत्र असलेल्या उमेदवारांना अपंग व्यक्तीसाठी असलेले कोणतेही फायदे देय नाहीत.

8.6 अपंग व्यक्तीसाठी आारक्षित पदावर नियुक्तीकरीता संबंधीत व्यक्तीने त्या पदासाठी असलेली विहीत अर्हता धारण करणे आवश्यक आहे. तसेच त्या पदावर काम करण्यास तो सक्षम असला पाहीजे.

8.7 अपंग व्यक्तीसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी मा. जिल्हा शल्य चिकित्साकडीत निःसमर्थ व्यक्ती (अपंग) चे प्रमाणपत्र आवश्यक आहे. तसेच निःसमर्थ व्यक्ती (अपंग) किमान 40 टक्के असणे आवश्यक आहे.

8.8 शासन परिपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग क्र. सीव्हीस–2013/प्र.क्र.182/ विजाभज–1 दि. 17/08/2013 अन्वये जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार उन्नत व प्रगत व्यक्ती/गट यामध्ये मोडत नसल्याचे नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्राचे वैधतेचा कालावधी विचारात घेण्यात येईल.

8.9 खेळाडूच्या आरक्षण व वयोमर्यादेसाठी शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. सक्रीयो–2002/प्र.क्र. 68/क्रियुसे/2 दि. 01/07/2016 मध्ये देण्यात आलेल्या सर्व समावेशक सूचनाचे अवलोकन करावे.

8.10 माजी सैनिक बडतर्फीने गैरवर्तणूक किंवा अकार्यक्षमता या कारणांसाठी अथवा सैनिकी सेवेसाठी शारिरीक क्षमता नसल्याने किवा आजारपणामुळे सेवा संपूष्टात असलेले माजी सैनिक /आणीबाणी व अल्पसेवा राजाधिष्ट अधिकारी वयोमर्यादेच्या सवलतीसाठी पात्र ठरणार नाहीत.

8.11 महिलांसाठीचे आरक्षण

1) महिलांसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्र. 82/2001/ मसेआ–2002/प्र.क्र. 415/का–2 दि. 25/05/2001 आणि तद्नंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

2) महिलांच्या आरक्षित पदाच्या लाभाकरीता उमेदवार महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारणपणे रहिवासी असावा.

3) महिलांचे आरक्षण हे त्या त्या संवर्गासाठी संमातर आरक्षण राहील. तथापी भरतीच्या वर्षात मागासवर्गीय महिलांकरीता आरक्षित पदासाठी त्या त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत, तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील पुरूष उमेदवारांमार्फत भरण्यात येईल.

4) अमागास महिलांसाठी आरक्षित असलेल्या पदावर नियुक्तीकरीता त्या संवर्गातील योग्य महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या जागा केवळ अमागास वर्गवारीतील उमेदवारामधूनच गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

5) अमागास उमेदवारांपैकी उन्नत आणि प्रगत व्यक्ती/ कुंटुबातील (क्रिमिलेयर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले 30 टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/कुटुंबातील महिला सदस्यांना महिलांचे 30 टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

6) अमागास महिलांसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या अमागास व महिला उमेदवारांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी असल्याबाबत तसेच नॉन क्रिमिलीयेर मध्ये मोडत असल्याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

7) अमागास महिलांकरीता आरक्षीत असलेल्या पदांसाठी दावा करणाऱ्या अमागास महिला उमेदवारांनी महानगरपालिकेतर्फे जाहिरात ज्या वित्तीय वर्षात (एप्रिल ते मार्च) दिलेल्या त्या वर्षाचे लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षातील, क्रिमीलीयेर मध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेल्या खुल्या प्रवर्गातील महिलाकरीता नॉन क्रिमिलीयेर प्रमाणपत्र मुलाखतीच्या/प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. त्या पुर्वीचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाही.

8) अन्य मागासवर्गातील उमेदवारासाठी विहीत करण्यांत आलेले नॉन क्रिमिलीयेर प्रमाणपत्र अमागास/खुल्या महिलांसाठी आरक्षित असलेल्या पदाकरीता ग्राहय धरले जाणार नाही.

9) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक सिबीसी–2013/प्र.क्र. 182/विजाभज–1 दि. 17/08/2013 अन्वये जारी करण्यांत आलेल्या आदेशानुसार उन्नत व प्रगत व्यक्ती/गट यामध्ये मोडत नसल्याचे नॉन क्रिमिलीयेर प्रमाणपत्राच्या वैधता कालावधी विचारात घेण्यात येईल.

10) शासन निर्णय समाज कल्याण संस्कृतीक कार्य व क्रिडा विभाग क्र. सिबीसी – 1098/प्र.क्र. 151/मबाक–5 दि. 07/05/1999 अन्वये शासनाने आंतरजातीय विवाह केलेल्यांना मिळणाऱ्या मागासवर्गाच्या सवलती/फायदे रद्द केले आहेत. त्यानुसार आंतारजातीय विवाह केलेल्या उमेदवारांनी अर्ज सादर करतांना आवश्यक ती दक्षता घ्यावी.

**9. इतर सर्वसाधारण अटी/शर्ती/सुचना**

9.1 पात्रता/आरक्षणा संदर्भात अर्जामध्ये निर्विवादपणे दावा केलेला असणे आवश्यक आहे.
अर्जामध्ये प्रत्येक दाव्याच्या पुष्टयार्थ आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्याशिवाय
पात्रता/आरक्षणाचा दावा ग्राहय समजला जाणार नाही.

9.2 नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र आवश्यक असणाऱ्या प्रवर्गातील उमेदवार यांनी उन्नत व प्रगत
गटाबाहेरील आहेत असे अर्जामध्ये स्पष्टपणे नमुद करणे आवश्यक आहे. असे नमूद
केलेल्या उमेदवारांनी कागदपत्र पडताळणी दिनांका पर्यन्त निर्गमित केलेले नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. अर्जामध्ये उन्नत व प्रगत गटाबाहेरील नाही असे नमूद केले असल्यास नंतर सादर करण्यात आलेले नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र निवडीसाठी ग्राहय धरले जाणार नाही.

9.3 उमेदवारांने अर्जामध्ये स्पष्टपणे "होय/(Yes) " असे नमुद केले असल्यास कागदपत्र पडताळणीच्या दिनांका पर्यन्त निर्गमित केलेले अधिवास प्रमाणपत्र विवाह नोंदणी प्रमाणपत्र, अपंगत्वाचे प्रमाणपत्र, अंशकालीन असल्याबाबत दाखला व स्वंय रोजगार, मार्गदर्शन केंद्रा कडील अंशकालीन अनुभवाच्या नोंदनी बाबतची प्रमाणपत्र प्रकल्प ग्रस्त दाखला, भुकंप ग्रस्त दाखला, निवडीसाठी ग्राहय धरण्यांत येईल. अर्जामध्ये संबधीत बाबीचा/आरक्षणाचा स्पष्टपणे उल्लेख/दावा केलेला नसल्यास, तद्नंतर अथवा पडताळणीच्या वेळी सादर केलेल्या कागदपत्राच्या/प्रमाणपत्राच्या निवडीसाठी विचार केला जाणार नाही व त्याबाबतच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

9.4 अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा व त्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र अर्जदाराकडे असणे आवश्यक आहे. अर्जदाराकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. रिपभ/प्र. क्र. 66/2011/ई–10 दि. 27/03/2011 नुसार अर्जदाराकडे महाराष्ट्र राज्यात जन्म झाल्याबाबतचा पुरावा असणे आवश्यक आहे.

9.5 उमेदवाराने ऑनलाईन परिक्षेची प्रवेशपत्रे, परिक्षेचे वेळापत्रक, बैठकव्यवस्था, कागदपत्रे, पडताळणीसाठी पात्र उमेदवारांची यादी, निवेदने, तात्पुरती निवड व अतिरिक्त सूची, अंतिम निवड व अतिरिक्त सूची व इतर सर्व सुचना हया वेळोवेळी https:// maharecruitment . mahaonline. gov .in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येतील त्याबाबत उमेदवारांनी लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारानी भरतीप्रक्रीया पूर्ण होईपर्यन्त वेळोवेळी संकेतस्थळावरील सुचना पहाव्यात. संकेतस्थाळावरील सूचना पाहिल्या नाही या कारणास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

9.6 उपरोक्त पदांकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णय क्र. प्रशिक्षण 2000/प्र.क्र. 61/2001/39 दिनांक 19/03/2003 नुसार संगणक हाताळणी बाबतची शासनाने विहित केलेले प्रमाणपत्र बंधनकारण राहील.

9.7 निवड झालेल्या उमेदवारांला नियमित तत्वावर नियुक्ती नंतर नागपूर महानगरपालिका सेवा विनियम लागु होतील.

9.9 निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अंनियो–1005/सेवा–4 दिनांक 31/10/2005 नुसार नवीन अंशदान निवृत्ती वेतन योजना म्हणजेच परिभाषिक अंशदान निवृत्ती योजना 31/10/2005 नुसार नवीन अंशदाान निवृत्ती वेतन योजना म्हणजेच परिभाषिक अंशदान निवृत्ती योजना ( Defines contrivotion pension system) लागु राहील.

9.10 शासन निर्णय क्र संकीर्ण/2007/पडताळणी नवी–26 दि. 21/11/2007 अन्वये निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबधीत पोलीस ठाण्याकडून प्राप्त झाल्यानंतर त्याची/तीची सदर पदावर नेमणूक केली जाईल.

9.11 महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र. एस.आर.व्ही–2000/प्र.क्र. 17/2000/2012 दि. 01/07/2005 नुसार लहान कुटुबांचे प्रतिज्ञापत्र नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

9.12 नमूद पदावर अंतिम निवड झाल्यावर नियुक्तीपूर्वी उमेदवाराची मा. वैद्यकीय अधिक्षक, महापलिकेचे रुग्णालय यांच्याकडून वैद्यकीय तपासणी केली जाईल व त्यामध्ये वैद्यकीय दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती दिली जाईल.

9.13 उमेदवारास मराठीचे ज्ञान असने आवश्यक आहे.

9.14 उमेदवारांनी नोकरीसाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल. अर्जातील माहिती बदलाबाबत नंतर कोणत्याही प्रकारचे अर्ज स्विकारल्या जाणार नाही. अथवा बदल विचारात घेतल जाणार नाहीत.

9.15 नियुक्तीसाठी पात्र असणाऱ्या उमेदवारानी विहित केलेली इतर बंधपत्र/प्रतिज्ञापत्र/वचनपत्र/करारपत्र इत्यादी विशिष्ठ स्वरुपात भरुन दिल्याशिवाय महापालिका सेवेत रुजु करुन घेतले जाणार नाहीत.

9.16 निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर उमेदवारांची निवड झाल्यावर किंवा नियुक्ती दिल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराचे अर्जात व ऑनलाईन परिक्षेचे वेळी दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी निवड, नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल याबाबत कोणताही पत्र व्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

9.17 महापालिकेने निश्चित केलेल्या दिनांकास व ठिकाणी पात्र उमेदवारांना ऑनलाईन परिक्षेसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

9.18 सदर भरती अंतर्गत स्थायी नियुक्ती दोन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी ( नैमतिक रजा सोडून अन्य कोणत्याही रजेचा / अनुपस्थितीचा कालावधी वगळून) असेल व दोन वर्षानंतरचे सेवा सातत्य उमेदवाराच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबुन असेल.

9.19 निवड झालेल्या उमेदवारांची नागपूर महानरगपालिकेच्या कार्य क्षेत्रातील कोणत्याही कार्यालयात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा महापालिकेच्या कोणत्याही कार्यालयात बदली योग्य असेल. तसेच निवड झालेल्या उमेदवारांना आवश्यकतेनुसार पाळयामध्येही ( Shift duties) काम करावे लागेल.

9.20 भरती प्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार आयुक्त नागपूर महानगरपालिका यांना असून कोणत्याही टप्प्यावर भरती स्थगित करण्याचे अधिकार मा. आयुक्त नागपूर महानगरपालिका यांनी राखुन ठेवले आहे.

9.21 निवड झालेल्या उमेदवारांना महापालिकेचे निवास्थान उपलब्ध करुन दिले जाणार नाही व निवास्थाान देण्याची जवाबदारी प्रशासनाची राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

9.22 उमेदवारांनी या भरती प्रक्रिये संदर्भातील माहिती व सुचना नागपूर महानगरपालिका संकेत स्थळावर प्रसिध्द होणार असल्याने भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यन्त कृपया www.nmcnagpur.gov.in वरील वेबसाईट उमेदवारांनी वेळोवेळी पाहावी.

9.23 सरळसेवा भरती प्रक्रियेत अर्ज सादर केल्यापासून निवड प्रक्रिया संपेपर्यन्तच्या काळात घडणारे बदल उदा. निलंबन, दंड, फौजदारी खटला, शिस्तभंग विषयक अथवा तत्सम कारवाई इत्यादी, वेळोवेळी कळविणे आवश्यक आहे. अर्ज सादर केल्यानंतर घडुन आलेले बदल न कळविल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

9.24 उमेदवारी संदर्भातील कोणत्याही तरतूदी नागपूर महानगरपालिकेडून कोणत्याही क्षणी पुर्वलक्षीप्रभावाने बदलण्याची शक्यता आहे. सदर बदल आवश्यकतेनुसार निदर्शनास आणण्यात येतील. व संबधीतावर बंधनकारक असतील असे बदल प्रसिध्दी पत्रक इत्यादी सर्वसाधारणपणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. त्याकरीता उमेदवारांनी वेळोवेळी महानगरपालिकेचे वेबसाईट चे अवलोकन करणे त्यांच्या हिताचे राहील.

9.25 महानगरपालिकेने वेळोवेळी घेतलेले निर्णय संबधीतावर बंधनकारक असतील.

9.26 सामाजिक आरक्षण समांतर आरक्षण, मागास प्रवर्ग/नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र,भुकंपग्रस्त, प्रकल्पग्रस्त, अपंग महिला, माजी सैनिक खेळाडु, अनुभव पात्रता इत्यादी संदर्भात वेळोवेळी प्रसिध्द करण्यात आलेल्या /येणाऱ्या शासन निर्णयाप्रमाणे अमंलबजावणी करण्यात येईल.

10. विशेष सुचना

1) महानगरपालिकेस सादर करण्यात आलेली सर्व कागदपत्रे/अभिलेख ही महानगरपालिकेच्या अभिलेखाचा भाग होतील व ती गोपनिय मानली जातील.

2) जर एखादया उमेदवाराने भरतीच्या कोणत्याची टप्प्यावर दबाव आण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचीत माध्यमाचा अवलंबकेल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

3) मध्यस्थ/ठग/नागपूर महानगरपालिकेच्या संबध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याच्या उमेदवारांना सुचना देण्यात येत आहे.

4) यापूर्वी सदर पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांनी जाहिरातीस अनुसरुन पुन्हा अर्ज करणे आवश्यक आहे.

**हस्ता/—अश्विन मुद्गल**
**आयुक्त**
**महानगरपालिका, नागपूर**

-